# साहित्य, समाज आणि संस्कृती : एक अनुबंध

**नर्मदा आर. कूराडे**

मराठी विभाग, जी. आय. बागेवाडी महाविद्यालय, निपाणी, कर्नाटक.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17260104

## ABSTRACT:

प्रस्तुत लेख साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्यातील अविभाज्य संबंधाचा अनुबंध स्पष्ट करतो. साहित्य हे समाजाचा आरसा असून, ते मानवी जीवन, समस्या, रूढी आणि परंपरा यांचे प्रतिबिंब दर्शवते. साहित्यातूनच समाजाचे वैचारिक, मानसिक आणि सांस्कृतिक पोषण होते. कलाकृतीकार आपल्या लेखनातून सामाजिक जाणीव व समस्या निवारण्यासाठी प्रेरणा देतात. संस्कृती म्हणजे प्रकृतीवर केलेले संस्कार असून, साहित्यातून तिचे दर्शन घडते आणि तिचे संवर्धन होते. आधुनिक काळात तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे आणि जागतिकीकरणामुळे पारंपरिक जीवनमूल्ये व संस्कृती संपुष्टात येण्याची भीती व्यक्त होत आहे. लेखकाने सृजनशील साहित्याच्या गरजेवर जोर दिला आहे, जेणेकरून राष्ट्रीय संचितांचे रक्षण होऊन, समाजात माणुसकी, कुटुंबवत्सलता आणि सकारात्मक जीवनमूल्ये पुन्हा रुजतील. साहित्य, समाज आणि संस्कृती परस्परांना पूरक ठरत असल्याने, या तीनही घटकांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे.

## KEYWORDS:

साहित्य, समाज, संस्कृती, अनुबंध, तंत्रज्ञान.

**प्रस्तावना:**

विश्वव्यापी चांगल्या विचारांचे दालन म्हणजे चांगला समाज होय. असे साहित्य समाज घडविण्याचे साधन असते. चांगले किंवा वाईट प्रतिबिंबित साहित्याची निर्मिती ही समाजातूनच प्रकट होताना दिसते. अशा साहित्याला "समाजाचा आरसा म्हटले जाते." समाज जीवनातील अनेक घटना, प्रसंग, मानवी जडणघडण, मानवी समस्या तसेच मनोरंजनात्मक कला, संस्कृतीची छाप प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे साहित्यातून समाजमनावर जास्त प्रमाणात संस्कारित होत असते. औपचारिक व अनौपचारिक साहित्याचा परिणाम मानवी मनावर होताना दिसतो. कधी मौखिक तर, कधी ऐकीव स्वरूपाचे साहित्य, अगदी जन्माला आल्यापासून भौतिक संस्काराने त्यांच्या मनावर बिंबत राहतात. कोणत्याही प्रकारचे साहित्य असो, जसे वैचारिक, राजकीय, धार्मिक, परिणाम बालमनावर होताना दिसतात. चांगले-वाईट संस्कारदेखील या सर्व घटकांचा समावेश एका साहित्यात होत असल्याने साहित्यामुळे समाज घडतो आणि बिघडतो सुद्धा; असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अशा वेगवेगळयाप्रकारे साहित्य समाजाला पूरक गोष्टींचे योगदान देत राहतो, यावर ठाम विश्वास ठेवणे आवश्यक वाटू लागते. शेवटी कोणत्याही समाजाचे अनुबंध साहित्याशी असते. साहित्य निर्मितीचा मुलाधार मनुष्य असल्याने त्याच्या सभोवतीचा विचार करण्याचे सामर्थ्य त्याच्यात आहे, त्यामुळे तो साहित्य निर्मितीचा मूळ घटक ठरतो. चांगल्या साहित्य निर्मितीसाठी फक्त काल्पनिक विचारांना स्थान देऊन चालत नाही, येथे खऱ्या वैचारिकतेची जोड देखील हवी असते. तेव्हा दर्जेदार साहित्य निर्मितीला अर्थ प्राप्त होतो. समाजातील मानवी जीवनाच्या जडणघडणीतील निर्माण होणाऱ्या संदर्भांना नाकारता येणार नाही. साहित्यातून समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा नष्ट करण्यास प्रबोधनात्मक प्रयत्न केले जाते, तसेच अनेक सामाजिक बंधनाच्या चौकटीत अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्याचे हत्यारही साहित्य असते. अशा साहित्यातून समाजाचा अंतःस्वर उमटतो. समाजातील वैचारिक, मानसिक, सांस्कृतिक पोषण साहित्यातूनच मिळते. एकूणच समाजाचे पोषक तत्त्वे, तसेच सामाजिक संवेदनशील कलाकृतीचे कार्यही इथूनच होत असते. समाजातील वृक्षता, भग्नता, भयावहता नष्ट करून समाजात आनंद, उत्साह आणि जिद्द तसेच मनोरंजकतेचा झरा वाहता

ठेवण्यासाठी साहित्याला प्रथम स्थान दिले जाते. मानवी जीवनात चैतन्य भरविण्याचे सत्कार्य साहित्यातून होताना दिसते.

साहित्य आणि सामाजिक अनुबंध एकमेकांवर अवलंबून असल्याने समाजाशिवाय साहित्य निर्माण होऊ शकत नाही. अशा साहित्याची निर्मिती वेळ, काळ, परिस्थितीनुसार जन्माला येते, असे पाश्चात्त्य साहित्यकार "तेन" यांचे मत लक्षात घ्यावे लागते.

**साहित्य आणि कलाकृती:**

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी असल्याने तो एका विशिष्ट गटात राहण्यास पसंत करतो. सर्व प्राण्यांमध्ये मनुष्य हा सर्वोत्तम बुद्धिजीवी आहे. त्यामुळे तो भौतिक निरीक्षणाच्या सहाय्याने भौतिक निसर्गाशी स्वतःला जुळवून घेतो व स्वतःचे जीवन घडवून समाजाला प्रेरणा देतो. असे चित्र अनेक चरित्र/आत्मचरित्रातून पाहायला मिळते. अशाप्रकारे निसर्गावर संस्कार करीत मनुष्य सुधारण्यास पात्र ठरला गेला. असे असताना स्वतःचे मन, बुद्धी, देह यावरही तो ज्याप्रकारे संस्कार करतो, त्यामुळे मनुष्य बदलत गेल्याची दृश्ये टप्प्या-टप्प्याने पाहतो. मनुष्य आपल्या संस्कार मूल्यांना जीवनात प्रथम प्राधान्य दिले जाते. यामुळे समाज सुधारण्यास पात्र ठरला, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. प्रत्येक मनुष्याची जीवन जगण्याची पद्धत वेगवेगळी असते. अर्थातच बहुतांशी कलाकृतीकारांच्या कलात्मक अनुभवांचे संदर्भक्षेत्र हे वेगवेगळे असते. त्यातून मनुष्याला हितावह प्रेरक करणारे साहित्य निर्माण करीत राहते. यामध्ये जीवनविषयक अनेक समस्या, कल्पना, हे सर्व मानवी जीवनाशी निगडित असल्याने या प्रकारचे संदर्भ, घटना घेऊनच कलाकृतीचा जन्म होताना दिसतो. कोणताही लेखक /कवी आपली कलाकृती केवळ आत्मानंद आणि लोकार्पणाची लोकहितासाठीची भावना ठेवून लिहीत असतो. यातून स्वतःची प्रतिभा, स्फूर्ती, उत्प्रेक्षा, कल्पना, भावनात्मकता, उत्पन्नता, अभ्यास आणि नवनिर्मिती अशा घटकांचा समावेश नकळतपणे कलाकृतीतून स्पष्ट होताना दिसतात. त्यातून वास्तविकतेच्या काही प्रतिक्रिया साहित्यातून उमटतात. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सामाजिक जाणीव करून देताना दिसून येतात. अशाप्रकारे साहित्यातून सामाजिक जाणीव व समस्यांच्या उणिवा भरून काढण्यासाठी कलाकृतीकार प्रेरक माहिती पुरविण्याचे सत्कार्य लेखनकार करताना दिसतो.

## साहित्य आणि संस्कृती:

कोणत्याही साहित्यात संस्कृतीचे दर्शन घडते. संस्कृतीची छाप समाजावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे पडल्याने साहित्याला एक वेगळे आकर्षण प्राप्त झाल्याचे दिसून येते. “संस्कृतीच्या संकल्पनेचा उलगडा करताना दोन शब्दांचा वापर केल्याचे दिसून येते. एक प्रकृती म्हणजे निसर्ग आणि विकृती म्हणजे प्रकृतीला बिघडविणारा घटक असतो, अथवा प्रकृतीला विकार जडण्याचा एक विकृत विकार असतो. असा बिघाड होऊ नये या उद्देशाने प्रकृतीवर करावयाच्या संस्काराला संस्कृती असे म्हणतात.” हा संदर्भ सह-प्राध्यापक गोकुळ शिखरे यांच्या “साहित्य आणि समाज एक आकलन” या पुस्तकातील संदर्भानुसार संस्कृती म्हणजे काय असते, हे खऱ्या अर्थाने समजून घेणे महत्त्वाचे वाटू लागते.

## साहित्य व संस्कृतीचे संवर्धन आणि समाज:

साहित्य निर्माण करणारा लेखक समाजाचाच एक घटक असतो. म्हणून साहित्यातील आशयसूत्र समाजाशी निगडित असल्याने त्यामध्ये मानवी जीवनातील धार्मिक किंवा नैतिकतेबरोबर समग्र अंतर्बाह्य जीवनाचे संस्कारित बीज समाजातूनच साहित्यात येतात. त्या चांगल्या-वाईट चालीरीती, रूढी, परंपरा, प्रथा याने समाज घातक ठरतो. काही वेळा समाजहितासाठी स्वतः प्रबोधित लेखनकृती तयार करणारा लेखनकार समाज घडविण्यास पात्र ठरतो, कलाकृती निर्माण करतो. यामुळे साहित्य आणि समाज घडविण्यास आत्मबळ प्राप्त करून देणारा कलाकृतीकार नेहमी समाज घडविण्याचे कार्य करताना दिसतो. त्यामुळे साहित्याचे आणि अशा संस्कृतीचे संवर्धन झाले पाहिजे. ती काळाची गरज वाटते.

## आधुनिक साहित्यावर तंत्रज्ञानाचा प्रभाव व संस्कृती:

आधुनिक जागतिकीकरणाचे हवालदील झालेल्या परिस्थितीमध्ये आपला गरीब वर्ग संघर्ष करून जगताना दिसतो आहे. त्यांच्या भवितव्याच्या दिशा अंधकारमय झाल्या असल्याने तसेच चढाओढीच्या व स्पर्धेच्या धक्काबुक्कीमध्ये प्रत्येक व्यक्ती आपल्या चालीरीती, रूढी, परंपरा, सणसमारंभ तसेच आदर्शमय जगण्याची ओढ संपुष्टात येते की काय याची भीती निर्माण झाल्याचे चित्र दिसू लागले आहे. पूर्वीच्या

समाजव्यवस्थेत ग्रामीण भागातील जीवनात मूळ फरक आढळून येताना दिसतो. सुधारणावादाचे भीषण वारे वाहत असले तरी, ग्रामीण मनात शांतपणे शांत पारंपरिक वळणाच्या जीवनपद्धतीला कधीच बाधा पोहोचली नव्हती. शेतकरी, कामकरी आपल्या दैनंदिन जीवनक्रमात कधी स्थिरता येऊ देत नसतानाची दृश्ये, तसेच बारा बलुतेदारांची जीवनपद्धत एकेकाळी संपुष्टात आलेली असली तरी, ती पूर्णतः न संपू देणारे ग्रामीण जनमानसात आपली संस्कृतीचा ओढा आपले अस्तित्व, एक वेगळी ओळख पटवून देताना दिसू लागतो. आपली संस्कृती जपून ठेवण्याची श्रद्धा, भक्ती, प्रेम, आपुलकी, जिव्हाळयाने माणुसकीचे नाते जपण्याबरोबर संस्कृतीला कवटाळून बसलेला आपला आदिम समाज आता वेळेनुसार बदलण्याची दृश्ये डोळयासमोर भकासपणे उभी टाकतात.

पूर्वापार चालत आलेल्या रितीरिवाज, जीवनमूल्यावर अधिष्ठित अशी जीवनशैली समाज मनावर अवलंबून होती. ती आता पार नष्ट होत असल्याचे चित्र आणि तंत्रज्ञानाचे प्रलयंकारी समाज-भस्मासुर याचा समाजाची वेगवेगळया प्रकारे विभागणी होताना दिसते आहे. स्वतंत्र जीवनशैलीला प्राधान्य दिले गेले आहे, अर्थातच जीवनशैलीचा परिस्फोटच झाला आहे.

आपल्या एकसंघतेच्या राष्ट्रात न राहता पाश्चात्त्यीकरणाच्या अति प्रगत देशांच्या थाटात येथील नागरिक वावरताना दिसू लागला आहे. आपल्या जीवन पद्धतीमध्ये सर्वतोपरी बदल झाला आहे. त्याचे खाणे, पिणे, राहणे आणि जगणे स्वयं-केंद्रीय असून स्वतंत्र विचाराने मशीन-प्रिय मनुष्याच्या विचाराने कोणत्याही प्रकारची माणुसकी, कुटुंबवत्सलता, रितीरिवाज, समाज, सणसमारंभ यामध्ये कमालीचे बदल दिसून आल्याने समाज सुधारविण्याच्या भूमिका कालबाह्य होताना दिसतात. एकेकाळी साहित्य का लिहिले जायचे, असे कोणी विचारले तर उत्तर असायची: समांतर समन्वय जीवनमूल्ये प्राप्त होतात. साधण्यासाठी परिपूर्ण मानवतेचा ध्यास अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी साहित्य लिहिले जाते.

**न जिथे आदित्य नाही तेथे अंधकार.**
**जिथे साहित्य नाही तिथे कुविचार॥**

अशाप्रकारे जीवनाची समग्र विचारांची खाण साहित्यात सामावलेली होती. अलीकडच्या कालखंडात समाज, संस्कृती आणि साहित्याची रूपरेखा बदलली आहे. यामुळे या विधानांचा समाज घडवून सोज्वळ जीवन पद्धत अवलंब करण्याच्या दिशा सांगून देण्यासाठी पात्र ठरले आहेत का, याचा विचार करायला लावणारी बाब ठरली आहे. नेमके कोणत्या क्षेत्रात मानवी प्रगती दिसून येते याचा अंतर्बाह्यरूपाने चिकित्सक अभ्यास करून शोध घ्यावा लागणार आहे. शैक्षणिक पद्धतीमध्ये उत्पादक नीतिमूल्ये आले पाहिजेत, त्याशिवाय जीवनसार समाजाला समजून सांगण्याची वेळ यायला वेळ लागणार नाही. पुन्हा प्रकाशातून अंधकारमय जीवनाशी भिडण्याची एक वेळ येऊ नये याची काळजी घेणे काळाची गरज असून अशा प्रकारचे साहित्य निर्माण झाले पाहिजे. स्वतंत्रपणे आपल्या देशातील संस्कृतीला जोपासण्याची परंपरा पुढे घेऊन जाण्यासाठी नव-साहित्याची निर्मिती होणे आवश्यक वाटते. यातून आपली संस्कृतीची जोपासना व्हायला मदत होईल यात शंका नाही, कारण कोणत्याही राष्ट्राची जोपासना, राष्ट्रीय संचितांचे रक्षण, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रीय जीवनमूल्ये व त्यांचे संवर्धन, राष्ट्रधारणा आणि समाजातील नवनिर्मितीमधील सततची प्रक्रिया यासाठी साहित्य मुख्य साधन व एक माध्यम ठरते, असे जागतिक कीर्तीचे विचारवंत “रोमाँ रोलाँ” यांनी म्हटले आहे.

अशा अनेक प्रकारचे विचार ऐकतो, वाचतो, मनावर बिंबविणारे असलो तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या दाहक वास्तवतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. समाजाला घातक ठरणारे अनेक घटक आहेत. अशांमध्ये समाज-उन्नतीसाठी विशाल मनाने सृजनशील साहित्याला निर्माण करणारे विवेकरूपी विद्वत्तेला जन्म देणे आता समाजासमोर आव्हान ठरले आहे. तंत्रज्ञानाच्या विळख्यात खऱ्या संस्कृतीचा लोप होतानाचे दृश्य एक बाजारपेठेसारखी संस्कृती आपली परंपरा विकायला निघालेली आहे, असे भयंकर परिवर्तन झाल्याचे चित्र दिसू लागले आहे. यातून अनेक सामाजिक प्रश्न सुटले नाहीत. जग कितीही उच्चांक गाठला असला तरी अजूनही जातीयता, धर्मांधता वाढतच आहे. शैक्षणिक दर्जा ढासळत आहे. एकूण सर्वतोपरी शोषण प्रक्रिया तंत्रज्ञानाच्या यंत्राने चालू आहे. यात भाषाभेद, प्रांतभेद यामुळे संपूर्ण समाज त्रस्त आहे. स्त्री-समस्या, शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्न, अस्वातंत्र्यपणे वागविण्यात आलेल्या

आदिवासींचे जगणे, एकूण समाज विकृत प्रकोपाच्या मार्गाला लागल्याने मनुष्याच्या जगण्याचे गंभीर प्रश्न समोर आहेत.

यावर उपाययोजना करणे समाजाला आव्हान ठरले आहे. यातून नवमार्ग शोधताना समाज एकीकडे सुधारण्याच्या वाटचालीवर असला तरी एकीकडे आपला समाज, आपली संस्कृती संपुष्टात येईल याची भीती मात्र स्वस्थ बसू देणार नाही.

एकेकाळी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासारखे विचारवंत त्यांच्या स्वप्नातला बलाढ्य भारत सुधारण्याच्या पातळीवर असताना पाश्चात्त्यीकरणाचे अतिक्रमण होऊ नये याची काळजी सर्वांना घ्यावी लागणार आहे, कारण जे समाजात घडते तेच साहित्यात उमटते आणि जे साहित्यात उमटते तेच समाजाला आरशासारखे आपले प्रतिबिंब दाखविते. यातून समाज घडत राहतो व संस्कृतीला चालना देतो.

**निष्कर्ष:**

अशाप्रकारे साहित्य, समाज आणि संस्कृती हे परस्पर अनुबंध एकमेकाला पूरक ठरतात. या तीनही गोष्टी जीवनमूल्ये देतात. त्यातून समाज व्यक्ती-केंद्रित विचारांवर न राहता सार्वभौम विचारधारेवर आपली संस्कृती टिकवून ठेवणे आणि ती घडवणे व याच्यासाठी शोध घेणे आवश्यक वाटू लागले आहे. विश्वविख्यात समाज सुधारण्याची मोहीम हाती घेताना आपल्या पूर्व-संस्काररूपी बीजांना सडू न देता त्या बीजरूपी संस्कारांची पुन्हा लागवड करणे गरजेचे आहे.

## संदर्भसूची:


1. साहित्य, भाषा आणि समाज- मिलिंद बोकील, मौज प्रकाशन गृह, मुंबई - 2016.
2. साहित्य आणि समाज एक आकलन- संपादक प्रा. गोकुळ शिखरे आणि डॉ. प्राजक्ता चित्रे - शब्दालय प्रकाशन.
3. साहित्य व सामाजिक संदर्भ – रा. ग . जाधव, आवृत्ती - 1975, प्रकाशक – कॉन्टिनेन्टल, पुणे.
4. समाज आणि साहित्य- सदा कऱ्हाडे- लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई.
5. मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती – आनंद यादव – मेहता पब्लिशिंग हाऊस, 1216 सदाशिव पेठ, पुणे.



**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.



**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.